Vol 3 Issue 3 April 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 3, April. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *भारतीय लोकशाही समोरील आव्हाने*

*माने प्रकाश रंगराव*

राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली) ता. पलुस, जि. सांगली

***सारांशः***

भारत हा जगातील लोकशाही मानणारा जगातील सर्वात मोठा देश आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या जवळपास 140 कोटीच्या घरात गेली आहे. भारतीय संघराज्यात वेगवेगळी राज्ये व केंद्रशासित प्रदेश मिळून भारतीय संघराज्य तयार झालेले आहे. भारतीय संघराज्याचा विस्तार जम्मूकाश्मिर पासून कन्याकुमारी पर्यंत व गुजरात पासून गुवाहाटी पर्यंत अशा अखंडप्राय देशात ज्या ठिकाणी हजारो जाती, शेकडो धर्म, पंथ, प्रत्येक घटक राज्याची भाषा वेगळी आहे. त्या त्या प्रांतातील विविध जातीसमुदायाच्या बोलीभाषा, विविध धर्मकल्पना वेगवेगळया आहेत. अशाप्रकारे विविधतेने नटलेल्या देशाला एकसंघ ठेवण्याची किमया ही संसदीयलोकशाही पध्दतीतच आहे.

### *प्रस्तावना :*

### *संशोधनाचा उद्‌देश :–*

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने लोकशाहीपुढील आव्हाने या विषयाचा अभ्यास करणे हा संशोधनाचा प्रमुख उद्‌देश आहे.

### *संशोधन विषयाची उद्‌दिष्टये:–*

भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने या विषयाचे अध्ययन अर्थपूर्ण होण्यासाठी चिकित्सक संशोधन पध्दतीच्या आधारे दुय्यम साधनाव्दारे पुढील उद्‌दिष्टये निश्चित करण्यात आली आहेत.

1) भारतीय लोकशाहीचा अर्थ व स्वरूप अभ्यासणे.
2) भारतीय लोकशाही संसदीय स्वरूपाची आहे.
3) राजकीय इच्छाशक्ती व महत्वकांक्षेच्या अभावामुळे भारतीय लोकशाहीस अनेक संकटांना सामना करावा लागत आहे.
4) वाढत्या समीकरणाचा आढावा घेणे.

### *संशोधन पध्दती :–*

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलन आणि विश्लेषण पध्दतीचा अवलंब करून, संशोधन विषयाशी संबंधत व्दितीय माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये विविध संदर्भग्रंथ, मासिके, विशेषांक, वर्तमान पत्रातील लेख, साप्ताहिक इ. आधारे हा शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

### *लोकशाही म्हणजे काय?*

लोकशाही याचा शब्दशः अर्थ 'लोकांची सत्ता' असा आहे. लोकशाही सत्ता ही एखादया व्यक्तीची किंवा गटाची मक्तेदारी नसते. राजकीय प्रक्रियेत आणि राजकीय सत्तेत सहभागी होण्याचा अधिकार सर्व नागरिकांना असतो. जनतेची इच्छा ही अंतिम आणि सर्वोच्च मानलेली असते. शासन हे लोकांना जबाबदार असते आणि लोकांच्या इच्छेनुसार शासनाने कार्य करावे अशी अपेक्षा असते.

### *लोकशाहीचा अर्थ :–*

'लोकशाही' या शब्दावरून लोकांना प्राधान्य देणारी, लोकांना केंद्रस्थानी
मानणारी आणि लोकांच्या इच्छा आकांक्षानुसार चालणारी शासनपध्दती असा तिचा अर्थ होतो.
लोकशाहीला इंग्रजीत क्मउवबतंबल असा प्रतिशब्द आहे. इंग्रजी शब्दाचा अर्थ साधारणतः 'Demos'म्हणजे लोक आणि 'ब्तंजवे'म्हणजे सत्ता या दोन लॅटीन शब्दापासून तयार झालेला आहे. यावरून लोकशाहीचा अर्थ लोकांची सत्ता असा दिसतो.

**Title :** *भारतीय लोकशाही समोरील आव्हाने*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ]** *माने प्रकाश रंगराव* **yr:2013 vol:3 iss:3**

### *लोकशाहीच्या व्याख्या :–*

लोकशाही विषयी निरनिराळया शास्त्रज्ञांनी विविध दृष्टीकोनातून व्याख्या केलेल्या आहेत. त्यामध्ये काही भावनात्मक तर कधी शास्त्रीय मतांचा समावेश झालेला आढळतो. त्यांपैकी काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील

1) अब्राहम लिंकन–
लोकांनी, लोकांसाठी, लोकांकरता चालविलेल्या शासनप्रणालीला
'लोकशाही' असे म्हणतात.
2) प्रा. सिली –
ज्या शासनसंस्थेत प्रत्येकाचा वाटा असतो ती लोकशाही होय.
3) महात्मा गांधी –
''लोकशाही हा एक जीवनाचा मार्ग आहे.''

वरील लोकशाहीच्या व्याख्या व अर्थ यावरून लोकशाही राज्यपध्दतीच्या माध्यमातून लोकांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध शासनाशी येतो असेच दिसून येते.

### *विषय प्रवेश –*

लोकशाही राज्यपध्दतीच्या माध्यमातून लोकांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनमान उंचावण्यासाठी भारतात 26 जानेवारी 1950 पासून भारतीय राज्यघटना अमलात आली पण वास्तवात स्वातंत्र्यानंतर भारतीय जनतेचे प्रश्न अधिकाधिक जटिलझाल्याचे दिसून येते. कारण भारतीय लोकशाही प्रगत व विकसीत होण्यासाठी लोकशाहीसमोर निर्माण झालेली आव्हाने यामुळे लोकशाहीची दिशा आणि गती मंदावल्याचे जाणवते त्या आव्हानांचा परामर्श पुढीलप्रमाणे घेता येईल असे मला वाटते.

### *लोकशाही समोरील आव्हाने –*

भारतीय लोकशाही समोर सर्वच पातळीवर मोठया प्रमाणात आव्हाने निर्माण झालेली आहेत. त्यात प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक, राजकीय सांस्कृतीक पातळीवरील आव्हानांना आज तोंड द्यावे लागत आहे.

### *जातीयव्यवस्था :–*

भारतीय राजकारणाचा विचार केल्यास जमातवादाप्रमाणेच भारतीय राजकारणात जातीयवादी प्रवृत्ती आढळते. जातीय व्यवस्था सामाजिक उच्च निच्चतेच्या कल्पनेवर आधारलेली आहे. ही उच्च निच्चता व्यक्तीच्या कर्तृत्वावरुन ठरत नाही तर जन्मावरुन ठरते. भारतीय लोकशाहीला जातीयतेची कीड लागलेली आहे. देशातील असा कोणताच भाग नाही की, तेथे जात हा घटक प्रभावी नसेल भारतीय राजकारणात जात हा घटक महत्वपूर्ण बनलेला आहे. भारतात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या वर्गात तीन हजार जाती उपजाती आहेत. आपलीच जात श्रेष्ठ असा अहंगंड प्रत्येक जातीत निर्माण झाल्यामुळे जातीजातीत संघर्ष निर्माण होतात. भारतातील विविध घटक राज्यात जातीचा प्रभाव स्पष्टपणे आढळतो. उदा. 1) बिहार – रजपूत, ब्राम्हण, कायस्थ व आदिवासी 2) कर्नाटक – रेड्डी, कामा 3) केरळ – नायर, इसाक 4) हरियाना – जाट, अहीर 5) राजस्थान – रजपूत, जाट तर 6) महाराष्ट्र – ब्राम्हण, मराठा, लिंगायत, वंजारी. भारतीय समाज जीवनात जातीला अनन्यसाधारण महत्व असून भारतीय समाज हा जातीबध्द आहे. त्यामुळे समाजाचे विघटन होते. एकसंघता नष्ट होऊन सामाजिक अंतर्गत संघर्ष होतात. यामुळे लोकशाहीला धक्का लागतो. भारतीय समाज जाती उपजातीचे तटबंध असल्यामुळे लोकशाही स्थिर व यशस्वी होऊ शकलेली नाही.

निवडणूकीमध्ये टिकीट वाटप करताना सुध्दा जात व धर्माला प्राधान्य दिले जाते. त्यातून निवडणूकीनंतर सुध्दा राजकर्त्याकडून आपला धर्म, आपली जात याच संकुचित भावनेतून निर्णय घेतले जाताना आढळतात. अशा स्थितीत आदर्श लोकशाही कधी प्रस्थापीत होणार?भारतातील जातीयवाद हा लोकशाही विकासात व राष्ट्रीय एकात्मता संवर्धनात मोठा अडथळा निर्माण झालेला आहे.

### *सामाजिक विषमता :–*

भारताचा प्राचीन काळातील इतिहास पाहिल्यानंतर सामाजिक विषमतेच्या खुणा पाहायला मिळतात. व्यक्ती व्यक्तीत धर्म, जात, वर्ण, वंश, भाषा, लिंग इ. कारणावरून कोणताही भेदभाव न करता सर्वांना विकासाची समान संधी देणे लोकशाहीचे उद्दिष्टय आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र तसे घडताना दिसत नाही. कायद्याने सामाजिक विषमता केली तरी भारतासारख्या देशात आजही समाजात स्पृश्य–अस्पृश्य, श्रेष्ठ–कनिष्ठ, उच्च–निच्च अशी भेदभावाची भावना दिसून येते. लोकशाही अधिक कार्यक्षम होण्यासाठी सामाजिक विषमतेचे उच्चाटन होणे आवश्यक आहे. परंतू गेल्या अर्धशतकांच्या वाटचालीनंतर ही विषमतेची दरी रुंदावत चालली आहे. लोकशाही देशाला पूर्वापार चालत आलेल्या अनिष्ठ रुढी व सामाजिक विषमतेचे मोठे आव्हान आहे.

### *आर्थिक विषमता :–*

भारतात ज्याप्रमाणे सामाजिक विषमता आहे त्याचप्रमाणे आर्थिक विषमतासुध्दा मोठया प्रमाणात असल्याचे दिसते. भारतासारख्या आजही मोठया प्रमाणावर लोक दारिद्रय रेषेखालील आहेत. बेकारीचे प्रमाण प्रचंड मोठे आहे. देशात झालेल्या औद्योगिकरणामुळे, हरितक्रांतीमुळे एक सधन वर्ग निर्माण झालेला आहे. यावर्गाचाही विस्तार झालेला आहे. परंतू हे सुस्थितीतील वर्ग आणि आदिवासी, शेतमजूर, भटक्या जमाती अशा दरिद्री वर्ग यातील आर्थिक विषमतेची दरी फार मोठी आहे. ही आर्थिक विषमता सामाजिक असंतोषाचे आणि संघर्षाचे मोठे कारण असते. भारतात होत असलेल्या अनेक सामाजिक संघर्षाचे मूळ आर्थिक प्रश्नात असल्याचे दिसून येते. ज्याप्रमाणे जमिनीत बी पेरल्यानंतर त्याला अंकूर येण्यासाठी चांगली जमिन, हवा, पाणी, सूर्यप्रकाश यांची गरज असते. सूर्यप्रकाश मिळाल्याशिवाय शिवाय अंकुर येऊ शकत नाही, त्याचप्रमाणे केवळ राजकीय स्वातंत्र्य देवून चालणार नाही तर आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्यही महत्त्वाचे आहे.

### *धर्मांधता –*

भारतामध्ये विविध धर्म आणि संस्कृती अस्तित्वात आहेत. हे विविध धर्म कित्येक शतकापासून एकत्र राहत आहेत. मुख्य धर्मामध्ये हिंदू, मुस्लिम, शिख, ख्रिचन, पारशी, जैन, बौध्द यांचा समावेश होतो. या भिन्न धर्मीय लोकांमध्ये ऐक्याची, सहकार्याची भावना आढळत नाही. भारतात हिंदू मुस्लिम संघर्षातून देशाची फाळणी झाली.

धर्मांधतेमुळे लोक आपल्या धर्माचे संरक्षण, पालन करतात आणि इतर धर्मांना विरोध करतात. धार्मिक विषमतेमुळे भारतात गेल्या 64 वर्षात ज्या ठळक दंगली झालेल्या आहेत त्यात प्रामुख्याने 1950 सालची दिल्ली, कोलकता, मुंबई, अलिगडतसेच 1969 साली गाईची हत्या करण्यावरून अहमदाबादमध्ये मोठया प्रमाणावर दंगल झाली. त्यानंतर 1970 मध्ये भिवंडीत दंगल होऊन तिचे  लोन महाड, जळगाव व महाराष्ट्राच्या अनेक शहरात पसरले व हजारो लोकांचे नाहक बळी गेले. 1970 साली जमशेदपूरची दंगल, 1982 ची बडोदा दंगल, 1984 साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर दिल्लीत झालेल्या दंगलीत शेकडो शीख धर्मियांचा बळी घेण्यात आला. इ. स. 1992–1993 मध्ये 'बाबरी मस्जिद – राम जन्मभूमी' वादावरून झालेल्या दंगलीत तर अखंड देशात आगडोंब उसळला. तर 2002  मधील गोध्रा प्रकरण या सर्व दंगलीचे तत्कालीन कारण काहीही असले तरी त्याची मुख्य प्रेरणा धर्मच होती. प्रसिध्द विचारवंत कार्ल मार्क्सने धर्माबाबत म्हटले आहे की, ''धर्म ही अफूची गोळी आहे!'' त्याचा अर्थ अफू खाल्यानंतर तो मेंदूवर पकड घेतो व विचार करण्याची क्षमता व ताकद नष्ट करून टाकतो. माणून विवेक बुध्दी गहाण टाकून सैरावैरापळतो अगदी तीच धर्माची भूमिका तीच आहे. म्हणून भारतातील धर्मांधता हे लाकशहीपुढील एक मोठे आव्हान असल्याचे पहावयाला मिळते.

### *निष्कर्ष :–*

भारतीतील लोकशाही पुढील आव्हाने लक्षात घेतल्यानंतर असे आढळते की, भारतीय लोकशाहीला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. आव्हाने लक्षात घेता गेल्या 65 वर्षात वेगवेगळया क्षेत्रामध्ये भारतीय लोकशाहीने जरी प्रगती केलेली आढळत असली तरी एक आदर्श लोकशाही व्यवस्था म्हणून परीपूर्ण लोकशाही व्यवस्था म्हणून भारतीय लोकशाहीला बरीच वाटचाल करावयाची आहे. संसदीय लोकशाही यशस्वी होण्याकरता राजकीय नेतृत्व तसेच भारतीय समाजामध्ये संसदीय लोकशाहीची तत्वे समजने गरजेचे आहे. कारण त्यादृष्टीने आवश्यक समाजमन भारतामध्ये अजुनपर्यंत प्रस्थापितझालेले नाही.

### *उपाययोजना –*

लोकशाही पुढील आव्हाने दूर करण्याच्या दृष्टीने पुढील अटी उपाय करणे गरजेचे आहे असे मला वाटते.

1) जातीवादाची आणि सांप्रदाय वादाची भावना दूर करणे.
2) राजकीय संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे.
3)सामाजिकसमता प्रस्थापित करण्यासाठी राजकीय कायदेशीर बाबीपेक्षा समाजातील व्यक्तीची भावना या परिवर्तनास अनुकुल होईल या दृष्टीने प्रयत्न करावयास हवेत.
4)समाजातील आर्थिक विषमता दुर कराण्यासाठी शासनाने सर्वागीण कृषी विकासाचा कार्यक्रम हाती घ्यावा व ग्रामीण विकासावर भर दयावा.
5) आर्थिक सक्षमीकरणासाठी औदयोगिकरणास चालना दयावी.
6) अधुनिकीकरणाचा जास्तीत जास्त अवलंब करण्यात यावा.
7) धर्म आणि राजकारण परस्परापासून दूर ठेवावे व धर्माचा राजकारणाबाबत करण्यात येणाऱ्या वापरावर बंदी घालावी.

### *संदर्भः–*


1) बी. बी. पाटील –भारतीय शासन आणि राजकारण
2) शांताराम भोसले – आधूनिक राज्यशास्त्र
3) डॉ. भा. ल. भोले – भारतीय राजकीय व्यवस्था
4) प्रा. बी. टी. देशमुख – भारतीय राजकीय व्यवस्था
5) लोटे रा. ज. – भारतीय संविधान आणि राजकारण
6) प्रकाश बाळ / किशोर बेडकीहाळ –भारतीय राजकीय व्यवस्था प्रक्रिया आणि स्वरूप
7) पानसरे गोंविद – धर्म, जात, वर्ग आणि परिवर्तनाच्या दिशा
8) पानसरे गोंविद – मार्क्सवादाची तोंड ओळख
9) सुहास पळशीकर – समकालीन भारतीयराजकारण कॉग्रेस वर्चस्व ते हिंदु जमातवाद
10) प्रा. डि. के. देशमुख – आधूनिक राजकीय विचार प्रणाली
11) डॉ. अशोक जैन – प्रारंभिक राज्यशास्त्र
12) बी. बी. पाटील व सौ. उर्मिला एस. चव्हाण – भारतातील राजकीय प्रक्रिया
13) प्रा. चि. ग. घांगरेकर  – राज्यशास्त्राची मूलतत्वे
14) डॉ. अशोक जैन व डॉ. शिरीष डी. पवार – राजकिय सिध्दांताची मूलतत्वे
15) अ. वा. वाईकर – राज्यशास्त्र
16) डॉ. शांताराम भोगले – आधूनिकराजकीयसिध्दांत
17) डॉ. शैलेन्द्र देवळाणकर – समकालीन जागतिक राजकारण (प्रमुख प्रश्न)
18) के.सागर / प्रा. चि. ग. घांगरेकर – राज्यशास्त्र सिध्दांत आणि राजकिय विचार
19) डॉ. अलका देशमुख – भारतीय शासन आणि राजकारण
20) डॉ. अशोक चौसाळकर – मार्क्सवाद, उत्तर मार्क्सवाद
21) डॉ. अलका देशमुख– 21व्या शतकातील बदलते समाजकारण आणिराजकारण.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net